महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९०३/११०७
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : **१३.०१.२०२०**

# परिपत्रक

**विषय : वीज सेवक यांना तंत्रज्ञ या पदावर सामावून घेतल्यानंतर सा.आ.क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ मधील तरतुदीनुसार दोन अतिरिक्त वेतनवाढी लागू करणेबाबत.**

**संदर्भ :** १) सामान्य आदेश क्र. १६२ (क) दि. १५.०३.२००५.
२) सामान्य आदेश क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र. १६३ दि. ०४.०८.२००८.
४) प्रशासकीय परिपत्रक क्र. २०४ दि. ०४.०२.२००९.
५) प्रशासकीय परिपत्रक क्र. ३६२ दि. १९.१०.२०११.
६) परिपत्रक क्र. २०९२३ दि. २६.०७.२०१९.

दिनांक ०९.०८.२०१९ रोजी सांघिक कार्यालयस्तरावर कर्मचारी तक्रार निवारण बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये वीज सेवक पदावरून तंत्रज्ञ पदी सामावून घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सा.आ. १६६ (क) दि. २१.०७.२००५ नुसार अतिरिक्त दोन वेतनवाढी देण्यापासून वंचित ठेवल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

२. वरील मुद्याच्या अनुषंगाने पुन:श्च परिक्षण करण्यात आले असून, त्यानुसार निदर्शनास येते की, संदर्भित नियत कालावधीपूर्व योजनांमध्ये अर्हतारहीत वीजसेवक यांना कंत्राटी कालावधी संपल्यानंतर तंत्रज्ञ (तत्कालीन पद तारमार्ग मदतनीस/ कनिष्ठ तंत्रज्ञ) पदी सामावून घेण्याबाबतचा स्पष्ट उल्लेख आहे, आणि त्यांना सामावून घेतल्यानंतर त्यांनी आय.टी.आय. (इलेक्ट्रीशियन) किंवा तत्सम अर्हता प्राप्त करण्याबाबत कोणतीही तरतुद करण्यात आलेली नाही. या योजनेतील तरतुदीनुसार त्यांना नियमित पदावर सामावून घेण्यास (प्रवेश करण्यास) कोणतीही बाधा नाही. यास्तव त्यांना नियमित पदावर सामावून घेतल्यानंतर, सा.आ.क्र.१६६ (क) दि. २१.०७.२००५ परिच्छेद क्र. २ मधील अनुक्रमांक (v) मध्ये नमूद केल्याप्रमाणे ते दोन अतिरिक्त वेतनवाढी मिळण्यास देखील पात्र ठरतात.

३. सबब, कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाधीन नियत कालावधीपूर्व सेवानिवृत्ती योजनेच्या तरतुदींनुसार ज्या अर्हतारहीत वीज सेवकांना नियमित पदी सामावून घेण्यात आलेले आहे, त्यांना सा.आ. क्र. १६६ (क) दि. २१.०७.२००५ मधील तरतुदीनुसार नियमित पदी रूजु झाल्याच्या दिनांकापासून अतिरिक्त दोन वेतनवाढी मंजूर करण्यात याव्यात, तसेच त्यानुसार देय असणारे अनुषंगीक लाभ त्यांना अदा करण्यात यावेत.

४. याप्रकरणी पत्र क्र. मासंवि/रवका/न.क्र.११९/११६०० दि. २२.०४.२०१६ तसेच मासंवि/रवका/न.क्र.९/३०२१४ दि. ११.१२.२०१७ अन्वये, मुख्य अभियंता, जळगांव परिमंडळ, यांना देण्यात आलेल्या सूचना रद्द समजण्यात याव्यात.

५. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

13/1

**(कमांडर शिवाजी इंदलकर)**(से.नि.)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**